**शरद पवार ग्रामसमृध्दी योजना"**
**राज्य योजना म्हणून राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
**शासन निर्णय क्रमांकः मग्रारो-२०२०/प्र.क्र.७०/रोहयो-७**

१६ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय - ४०० ०३२
तारीख:- ०३ फेब्रुवारी, २०२१

<u>वाचा :</u>

१) नियोजन (रोहयो) विभागाचे शासन परिपत्रक क्र.मग्रारोहयो-२०२०/प्र.क्र.२१/रोहयो-७, दिनांक ०५ ऑगस्ट, २०२०
२) नियोजन (रोहयो) विभाग शासन परिपत्रक क्र.मग्रारोहयो-२०२०/प्र.क्र.२१/रोहयो-७, दिनांक ०२ सप्टेंबर, २०२०
३) नियोजन (रोहयो) विभाग शासन परिपत्रक क्र.मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.३६/रोहयो-१, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१२

<u>प्रस्तावना :</u>

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा मूळ उद्देश हा ग्रामीण भागातील व्यक्तींना अकुशल कामाची मागणी केल्यावर कामे उपलब्ध करुन देणे व त्याद्वारे कायमस्वरुपी मत्ता निर्माण करणे हा आहे. मुलभूत सुविधा कोणती द्यावीत यावर विचार करण्याची आवश्यकता असून त्यासाठी उद्दिष्टे स्पष्ट असणे आवश्यक आहे.

अलीकडच्या काळात कमी जमिनीचा योग्य वापर करुन मोठे उत्पन्न मिळवल्याचे उदाहरण समाज माध्यमांमध्ये मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्यात श्री. ज्ञानेश्वर बोडके यांचे उदाहरण घेता, ते सेंद्रीय शेती करुन एका एकरात दर वर्षी रु.१० लक्ष मिळवतात. एवढेच नाहीतर ते इतरांना असे करण्यास शिकवतात सुध्दा. अलीकडे मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशाने राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या एका गावात या पध्दतीने गटशेतीच्या माध्यमातून या प्रकारे उत्पन्न मिळवण्यासाठी हँडहोल्डिंगचे कार्यक्रम सुरु झाले आहे.

- श्री.बोडके ज्याप्रकारे शेती करतात त्यास पाणी, कंपोस्ट, गोमुत्र आणि गोबर लागते. अर्थात मग्रारोहयोच्या विविध योजनांच्या संयोजनातून या बाबी दिल्यास प्रत्येक शेतकरी श्रीमंत (लखपती) होऊ शकतात. त्यासाठी एक कुटूंब निवडून त्यांनाच शेततळे, गोठा, नाडेप आणि शोष खडडा एकाच वेळी एकत्रितरित्या द्यावे लागतील. त्याने ते शेतकरी समृध्दीच्या मार्गावर क्रमण करेल. तरच नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकाचा उद्दिष्ट **"मी समृध्द तर गाव समृध्द"** आणि **"गाव समृध्द तर महाराष्ट्र समृध्द"** साध्य होईल.

## पाण्याचे किफायतशीर वापरातून श्रीमंती

गावात पावसाचे पडणारे पाणी अडवण्यात यश आल्यावर त्या पाण्याचे किफायतशीर, आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि मेहनतीने फार अवघड नसलेल्या पध्दतीने वापर कसे करावे हा मुद्दा समोर उभा राहतो. “पाणी बजेट” च्या प्रशिक्षणात हा विषय हाताळला जाणार आहेच. सोबतच अशा पध्दतीने वापर केल्याने आपल्याच राज्यातील मोठ्या संख्येने लहान शेतकरी श्रीमंत झाले आहेत. याबाबतीत एक शेतकरी श्री. ज्ञानेश्वर बोडके यांची गोष्ट बोलकी आहे.

श्री. ज्ञानेश्वर बोडके महिना दहा हजार रुपये वर नोकरी करत होते. एके दिवशी त्याने बातमी वाचली की सांगली जिल्ह्यात एक शेतकरी दहा गुंठे जमिनीतून दरवर्षी दहा लाख रुपये कमावतो. ह्या व्यक्तीने तेथे भेट दिली. बातमी खरी होती. त्या शेतकऱ्याला एवढ्या छोट्याशा जमिनीतून आलेली समृद्धी पाहिली आणि त्यांनी तेथेच ठरवले की नोकरी सोडायची आणि शेती करायची. घटना छोटीशीच पण या घटनेने ते स्वतः समृद्ध तर झालेच शिवाय त्यांनी इतरांनाही मार्ग दाखवला.

आज ते अभिनव फार्मर्स क्लब चालवतात. ते स्वतः श्रीमंत तर झालेच आहेत पण इतरांनाही कसे श्रीमंत व्हावे हेही शिकवतात. सध्या एक लाखाच्या वर शेतकरी त्यांच्याशी जुळलेले आहेत. काही वर्षापूर्वी त्यांच्यासोबतच्या शेतकऱ्यांनी स्वतःसाठी एकाच दिवशी ३०५ मारुती कार खरेदी केल्या. एक एकर जमीन असेल तर रोज पंधरा वीस हजार लिटर पाणी वापरून समृद्ध शेती कशी करावी याकरिता एक एकर जमिनीत कोणती पिके घ्यावीत, असे केल्याने आज शिक्षित झालेली मुले मुली शेतात काम करू इच्छित नाहीत मग ती मुले शेतात कशी काम करतात. ऊन, थंडी आणि पावसात शेतीत हाताचे काम न आवडणाऱ्या आजच्या युवकांना शेतीशी निगडित कोणकोणती कामे द्यावीत यासाठी ते पॉलिहाऊसची संकल्पना सांगतात पहा https://youtube/VjG9vZ8ocf0 या लिंक वर व्हिडिओ.

वरील व्हिडीओ मध्ये लक्षात येते की श्री ज्ञानेश्वर बोडके नेमके काय सांगतात. त्यांना असे वाटते की आपल्या राज्यातील सर्व शेतकरी श्रीमंत आणि समृद्ध व्हावेत. याकरिता ते प्रशिक्षणाची मदत करायला तयार आहेत. प्रत्येक गाव, तालुका, जिल्ह्यातील शेतकरी यांनाही ते मदतीसाठी तत्पर आहेत, त्यांची मदत घ्यावी. तसेच आपल्या तालुक्यात/ जिल्ह्यात अशा प्रकारचे पॉलीहाऊस वापरून शेती करणारे लोक असतील तर तसे शेतकरी शोधण्यासाठी गुगल अर्थची ही मदत घ्यावी. अन्यथा अभिनव फार्मर्स क्लब यांचे संकेतस्थळ www.abhinavfarmerclub.org येथेही भेट द्यावी तसेच श्री ज्ञानेश्वर बोडके यांना ही ई-मेल द्वारे आपण संपर्क करू शकता. श्री ज्ञानेश्वर बोडके यांचा ई-मेल आयडी abhinavfarmersclub@gmail.com असा आहे. कृषी विभागाने उन्नत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या माहिती चा एक संसाधन बॅक तयार केला आहे. त्याचे लिंक http://krishi.maharashtra.gov.in/1313/Resource-Bank आहे.

श्री बोडके आणि त्यांच्या कुटुंबीयांनी हे सर्व कार्य करण्याची सुरुवात कशी केली, अडचणी आल्या त्यावर मात कशी केली, आणि असे करणे सर्वांना कसे शक्य आहे यावर आमच्या विनंतीवरून लिहून सुद्धा दिले आहेत. ते या परिपत्रकाचे परिशिष्ट १ मध्ये दिले आहे.

- तसेच भूमिहीन शेतमजूरांना सुध्दा याच प्रकारे संयोजनातून एकत्रित रित्या लाभ देऊन योग्य प्रशिक्षण दिल्यास ते जनावरांचे दुध, गोबर, मूत्र, शेळीपालन असल्यास मांस, गांडूळखत, सेंद्रिय खत इत्यादी विकून श्रीमंत होतील. याचेही कित्येक उदाहरण राज्यात उपलब्ध आहेत. अशा पध्दतीने शेतकरी असो की भूमिहीन शेतमजूर मग्रारोहयोतून आपण प्रत्येकाचा श्रीमंतीचा मार्ग खुला करु शकतो.
- प्रत्येकाच्या वार्षिक उत्पन्नाचा मोजमाप करण्याची सुध्दा तेवढीच आवश्यकता आहे जेणेकरुन प्रत्येक कुटूंब आपल्या वित्तीय निर्णय योग्य प्रकारे घेण्यास प्रवृत्त होतील, यासाठी एक ॲप विकसीत करण्यात येईल.

त्या अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काही योजनांच्या संयोजनातून (Combination) **"शरद पवार ग्रामसमृध्दी योजना"** राज्य योजना राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

**शासन निर्णय : -**

त्या अनुषंगाने, ग्रामीण भागातील कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक पात्र लाभार्थ्याला शरद पवार ग्रामसमृध्दी योजने अंतर्गत खालील नमूद केलेल्या ४ वैयक्तिक कामांना सर्वोत्तम प्राधान्यक्रमाने सर्व ग्रामपंचायत क्षेत्रात राबविण्यात यावे.

दिनांक ९ ऑक्टोबर २०१२ शा .नि मधील एका गावात जास्तीत जास्त ५ गोठयांची मर्यादा या शासन निर्णयान्वये वगळण्यात येत आहे.

**१) गाय व म्हैस यांच्याकरिता पक्का गोठा बांधणे**

**सद्य:स्थिती :-**

ग्रामीण भागामध्ये जनावरांच्या गोठयाची जागा ही सर्वसाधारणपणे ओबडधोबड व खाचखळग्यानी भरलेली असते, सदरचे गोठे हे क्वचितच व्यवस्थितरित्या बांधले जातात. गोठयांमध्ये मोठया प्रमाणावर जनावरांचे शेण व मूत्र पडलेले असते तसेच पावसाळयाच्या दिवसांत गोठयातील जमिनीस दलदलीचे स्वरुप प्राप्त होते व सदर जागेतच जनावरे बसत असल्यामुळे ते विवीध प्रकारच्या आजारांना बळी पडतात. तसेच काही जनावरांना स्तनदाह होऊन उपचारांसाठी हजारो रुपये खर्च होतात. तर काही वेळेस गाई/म्हशींची कास निकामी होते, त्यांच्या शरीराच्या खालील बाजूस जखमा होतात. बऱ्याच ठिकाणी जनावरांना चारा देण्यासाठी गव्हाणी बांधलेल्या नसतात. त्यांच्यापुढील मोकळया जागेवरच चारा टाकला जातो. या चाऱ्यावर बऱ्याच वेळा शेण व मूत्र पडल्याने जनावरे चारा

खात नाही व हा चारा वाया जातो. हे टाळण्यासाठी जनावरांच्या गोठयामध्ये जनावरांना चारा व खाद्य देण्यासाठी गव्हाण बांधणे अत्यावश्यक आहे.

**सुधारणेची गरज :-**

गोठयातील ओबडधोबड जमिनीमुळे जनावरांपासून मिळणारे मौल्यवान मूत्र व शेण यांचा संचय करता न आल्यामुळे ते मोठया प्रमाणावर वाया जाते. जनावरांचे मूत्र व शेण हे एक उत्कृष्ठ प्रकारचे सेंद्रीय खत असल्याने जनावरांच्या गोठयातील जागा ही सिमेंट कॉंक्रीटचा वापर करुन पक्क्या स्वरुपात सपाटीकरण केल्यास जनावरांपासून मिळणाऱ्या मूत्र व शेण गोठयाशेजारील खडडयामध्ये एकत्र जमा करुन त्याचा शेतजमिनीची सुपिकता व उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी उपयोग करुन घेता येईल.

**अनुज्ञेयता :-**

नियोजन (रोहयो) विभाग शासन परिपत्रक दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१२ अन्वये तसेच नियोजन (रोहयो) विभाग शासन निर्णय दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ मधील परिच्छेद ३.५.७ तरतुदींनुसार, ६ गुरांकरिता २६.९५ चौ.मी.जमीन पुरेशी आहे. तसेच त्याची लांबी ७.७ मी. आणि रुंदी ३.५ मी.असावी. गव्हाण ७.७ मी. X ०.२ मी. X ०.६५ मी. आणि २५० लीटर क्षमतेचे मूत्रसंचय टाके बांधण्यात यावे. जनावरांना पिण्याच्या पाण्याची २०० लिटर क्षमतेची टाकी सुध्दा बांधण्यात यावी.

सदर कामाचा लाभ मिळविण्यासाठी मनरेगा योजनेच्या निकषानुसार स्वत:ची जमीन, वैयक्तीक लाभाच्या निकषानुसार इतर आवश्यक कागदपत्र असलेले लाभार्थी पात्र असतील. गोठयांच्या प्रस्तावासोबत जनावरांचे टॅगिंग आवश्यक राहील.

या कामाला नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकातील परिशिष्ट-९ मधील अनुक्रमांक ७५ नुसार नरेगा अंतर्गत रु.७७,१८८/- इतका अंदाजित खर्च येईल. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अकुशल खर्च | - | रु. ६,१८८/- | (प्रमाण ८ टक्के) |
| कुशल खर्च | - | रु.७१,०००/- | (प्रमाण ९२ टक्के) |
| **एकूण** | **-** | **रु.७७,१८८/-** | **(प्रमाण १०० टक्के)** |

तथापि हे मापदंड सध्या प्रचलित मजूरी दर व DSR प्रमाणे आहे. जेव्हा केव्हा या दोनपैकी कोणत्याही एक किंवा दोन्हींच्या दरात बदल होईल तेव्हा या अंदाजित खर्चात बदल होईल. त्या प्रकारच्या बदलास मान्यता देण्याचा अधिकार जिल्हा कार्यक्रम समन्वयक/जिल्हा कार्यक्रम सह समन्वयक/ आयुक्त, मग्रारोहयो यांना प्रदान करण्यात येत आहे.

**उपरोक्त शासन परिपत्रकातील ६ गुरांसाठीची तरतूद रद्द करुन दोन गुरे ते ६ गुरे करिता एक गोठा व त्यानंतरच्या अधीकच्या गुरांसाठी ६ च्या पटीत म्हणजेच १२ गुरांसाठी दुप्पट व १८ पेक्षा जास्त गुरांसाठी ३ पट अनुदान देय राहील मात्र ३ पटीपेक्षा जास्त अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.**

## २) शेळीपालन शेड बांधणे :-

**सद्य:स्थिती :-**

शेळीपालन हा ग्रामीण भागातील अल्प उत्पन्न गटातील कुटूंबाच्या उपजिवीकेचे महत्वाचे साधन आहे. अल्प उत्पन्न असलेल्या ग्रामीण भागातील कुटूंबाच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्यासाठी शेळीपालन या व्यवसायाकरिता मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील शेळी मेंढी पालनावर उदरनिर्वाह करणारी गोरगरीब कुटूंबे पैशाअभावी शेळया-मेंढयाना चांगल्या प्रकारचा सरंक्षित निवारा देऊ शकत नाहीत. चांगल्या निवाऱ्याअभावी शेळया मेंढयामध्ये विवीध प्रकाराचे जंतजन्य, संसर्गजन्य, बाहयपरजीवी किटकांचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे रोगग्रस्त, खुरटी व आर्थिकदृष्टया फारशी किफायतशीर नसलेल्या शेळया-मेंढयाचे कळप पाळले जातात. याकरिता मागणी केलेल्या प्रत्येक कुटूंबास नरेगा योजनेअंतर्गत शेळीपालन शेड बांधणे हे काम उपलब्ध करुन देण्यात येईल.

**सुधारणेची गरज : -**

ग्रामीण भागामध्ये शेळया - मेंढयापासून मिळणारे शेण, लेंडया व मूत्र यापासून तयार होणा-या उत्कृष्ठ दर्जाच्या सेंद्रीय खतांचा पक्क्या स्वरुपाचे व चांगले गोठे नसल्याने नाश होतो. शेळया - मेंढयाकरिता चांगल्या प्रतीचे शेड बांधून दिल्यास या जनावरांचे आरोग्य देखील चांगले राहणार असून वाया जाणारे मल, मूत्र एकत्र करुन शेतीमध्ये उत्कृष्ठ प्रकारचे सेंद्रीय खत म्हणून वापर करता येईल. यामुळे शेतीच्या सुपिकतेबरोबरच शेती उत्पादन वाढीवर चांगला परिणाम होऊन उदरनिर्वाहासाठी मदत होऊ शकेल.

नियोजन (रोहयो) विभाग शासन परिपत्रक दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१२ अन्वये तसेच नियोजन (रोहयो) विभाग शासन निर्णय दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ मधील परिच्छेद ३.५.९ तरतुदींनुसार, १० शेळयांकरिता ७.५० चौ.मी.निवारा पुरेसा आहे तसेच त्याची लांबी ३.७५ मी. आणि रुंदी २.० मी.असावी. चारही भिंतीची सरासरी उंची २.२० मी. असावी. भिंती १ : ४ प्रमाण असलेल्या सिमेंटच्या व विटांच्या असाव्यात. छतास लोखंडी तुळयांचा आधार देण्यात यावा. छतासाठी गॅल्व्हनाइज्ड लोखंडी पत्रे / सिमेंटचे पत्रे वापरावेत. तळासाठी मुरुम घालावा. शेळयांना पिण्याच्या पाण्याची टाकी बांधावी.

सदर कामाचा लाभ मिळविण्यासाठी मनरेगा योजनेच्या निकषानुसार स्वत:ची जमीन, वैयक्तीक लाभाच्या निकषानुसार इतर आवश्यक कागदपत्र असलेले लाभार्थी पात्र असतील. तसेच भूमिहीन (शेती नसलेले) कुटूंबाना प्राधान्य देण्यात यावे.

**अनुज्ञेयता :-**

या कामाला नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकातील परिशिष्ट-९ मधील अनुक्रमांक ७६ नुसार नरेगा अंतर्गत रु.४९,२८४/- इतका अंदाजित खर्च येईल. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| अकुशल खर्च | - | रु. ४,२८४/- (प्रमाण ८ टक्के) |
| कुशल खर्च | - | रु.४५,०००/- (प्रमाण ९२ टक्के) |
| **एकूण** | **-** | **रु.४९,२८४/- (प्रमाण १०० टक्के)** |

तथापि हे मापदंड सध्या प्रचलित मजूरी दर व DSR प्रमाणे आहे. जेव्हा केव्हा या दोनपैकी कोणत्याही एक किंवा दोन्हींच्या दरात बदल होईल तेव्हा या अंदाजित खर्चात बदल होईल. त्या प्रकारच्या बदलास मान्यता देण्याचा अधिकार जिल्हा कार्यक्रम समन्वयक / जिल्हा कार्यक्रम सह समन्वयक/ आयुक्त, मग्रारोहयो यांना प्रदान करण्यात येत आहे.

**लाभार्थाने शेळीची व्यवस्था स्वत: करणे**

शेळी ही गरीबाची गाय समजली जाते. मुख्यत: भूमिहीन शेतमजूर शेळी पालन करतात. भूमिहीन शेतमजूराकडे समृद्धी करिता शेतजमीन नसल्यामुळे शेळीपालन किंवा तत्सम बाबीच श्रीमंती करिता शिल्लक राहतात. शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे १० शेळ्यांचा एक गट दिला जातो. शासनाचे अनुदान न मिळाल्यास एका भूमिहीन शेतकऱ्याला स्वतःच्या पैशातून दहा शेळ्या विकत घेणे शक्य होत नाही. त्यामुळे हे स्पष्ट करण्यात येते की दहापेक्षा कमी शेळ्यांचा गट असल्यास त्या शेतमजुराला गरिबीतून बाहेर पडणे अवघड जाते. सध्या बाजारात एक शेळी अंदाजे आठ हजार रुपयात मिळते. रोजगार हमी योजनेतून हा खर्च अनुज्ञेय नाही. एक भूमिहीन शेतमजूर स्वतःच्या पुंजीतून दोन शेळ्या जर विकत घेऊ शकला तर त्या शेळ्यांची संख्या दर सहा महिन्यात किमान दोन पट होते त्यामुळे एका वर्षात त्या शेतमजूर/शेतकरी यांच्याकडे १० शेळ्यांचा गट निर्माण होऊ शकतो. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबी पाहता **किमान दोन शेळ्या असलेल्या भूमिहीन मजुरांना/ शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय करणे योग्य होईल.**

तसेच हेही स्पष्ट करण्यात येते की शेळीपालनाच्या शेडसाठी **प्रत्येक दहा शेळ्यांसाठी एक गट** समजण्यात येईल व त्याप्रमाणे परिपत्रकानुसार अनुदान अनुज्ञेय करण्यात येईल तसेच, ज्या लाभार्थ्याकडे **१० पेक्षा अधीक शेळ्या असतील त्यांना शेळ्यांसाठीचे दोन गट लक्षात घेवून** दोन पट अनुदान राहील. मात्र एका कुटुंबास **जास्तीत जास्त ३० शेळ्यांकरिता तीन पट अनुदान मंजूर करण्यात येईल.**

**जगन प्रल्हादराव बगाडे**

मी, जगन प्रल्हादराव बगाडे खापरवाडी बु।। ता. अकोट जि.अकोला येथे राहत असुन माझे वडील श्री.प्रल्हादराव जगदेव बगाडे हे साधारणपणे पन्नास वर्षांपूर्वी बुलढाणा जिल्हा (शेलगाव मुकुंद) येथुन पोट भरण्याकरिता,मोलमजुरीसाठी खापरवाडी बु।। येथे स्वर्गीय बाळ महाजन यांच्याकडे पन्नास पैसे रोजच्या मजुरी करीत होते. आई वडिलांनी मजुरीतून थोडे पैसे साठवून सुरुवातीला एक बकरी व दोन पिल्ले(एकशे पंचेचाळीस) रुपयाला विकत घेतली होती. त्यापासून तीन वर्षात दहा शेळ्या विकून दोन एकर शेती विकत घेतली. सुरवातीला दोन वेळेस चे जेवण व अंगभर कपडे सुद्धा मिळत नव्हते. त्याही परिस्थितीत दोन शेळ्या शिल्लक राहिल्या. त्यापासून सकाळी

दुसऱ्याकडे मजुरी करणे व दुपारून शेळ्या चारणे ही कामे कधी आई तर कधी वडील नियमाने करीत राहिले. त्यानंतर घरच्या शेतातील पीक व शेळ्यांपासून झालेली पिल्ले विकून आणखी ३ एकर शेती घेतली. मागील परिस्थितीची पूर्ण जाणीव असल्याने आजही जवळ जवळ पन्नास वर्षांपासून आमच्या घरी बकरीचा खुटा मोड झाला नाही बकरीपासून आमची प्रगती झाली असून सुरवातीला घेतलेली शेती गावापासून खूप दूर होती.

आज आमच्याकडे गावाजवळच पंधरा एकर(बागाईत) शेती झाली असून शेळीपासूनच आमच्या प्रगतीला सुरवात झालेली आहे. त्यामुळे आम्ही आमच्या शेळीलाच आमची कुलदेवता मानतो.

आज प्रगतीपथावर असताना आम्हाला शेळ्यांबद्दल खूपच प्रेम आहे. त्यामुळे आमच्या कुटुंबातील कोणीही शेळ्या पूर्णपणे विकायला तयार नाही. शेतीपासून आम्हाला दरवर्षी साधारणपणे पन्नास हजार ते सत्तर हजार रुपये उत्पन्न मिळते. आजही आमच्याकडे १० शेळ्या व सहा पिल्ले आहेत. शेळी म्हणजे गरिबांचे a.t.m. मशीनच आहे असे मी मानतो. त्यामुळे शेतीला पूरक धंदा किंवा बेरोजगार युवक युवतींनी शेळीपालन हा व्यवसाय करून आपला प्रगतीचा मार्ग निवडावा असे मी नम्रपणे आवाहन करतो व यातून आपली प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही याची ग्वाही देतो.

आपलाच स्नेही,
जगन प्रल्हादराव बगाडे
८०८०२९३८६५

३) **कुक्कुटपालन शेड बांधणे**

**सद्य:स्थिती :-**

परसातील कुक्कूट पालनामुळे ग्रामीण भागातील कुटूंबाना पूरक उत्पादनाबरोबरच आवश्यक पोषक प्राणीजन्य प्राथिनांचा पुरवठा होतो. खेडयामध्ये कुक्कूटपक्षांना चांगल्या प्रतीचा निवारा उपलब्ध नसतो. त्यामुळे त्यांचे आरोग्य नेहमीच खालावलेले असते. कुक्कूटपक्ष्यांचे उन, पाऊस, परभक्षी जनावरे व वारंवार येणा-या आजारांपासून सरंक्षण करण्यासाठी चांगल्या प्रतीचा निवारा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. चांगल्या निवा-यामुळे रात्रीच्या वेळी त्यांचे, पिल्लांचे व अंडयाचे परभक्षी प्राण्यांपासून सरंक्षण होण्यास मदत होईल.

सदर कामाचा लाभ मिळविण्यासाठी मनरेगा योजनेच्या निकषानुसार स्वत:ची जमीन, वैयक्तीक लाभाच्या निकषानुसार इतर आवश्यक कागदपत्र असलेले लाभार्थी पात्र असतील. तसेच भूमिहीन (शेती नसलेले) कुटूंबाना प्राधान्य देण्यात यावे.

या कामाला नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकातील परिशिष्ट-९ मधील अनुक्रमांक ७७ नुसार नरेगा अंतर्गत रु.४९,७६०/- इतका अंदाजित खर्च येईल. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अकुशल खर्च | - | रु. ४,७६०/- | (प्रमाण १० टक्के) |
| कुशल खर्च | - | रु.४५,०००/- | (प्रमाण ९० टक्के) |
| **एकूण** | **-** | **रु.४९,७६०/-** | **(प्रमाण १०० टक्के)** |

तथापि हे मापदंड सध्या प्रचलित मजूरी दर व DSR प्रमाणे आहे. जेव्हा केव्हा या दोनपैकी कोणत्याही एक किंवा दोन्हींच्या दरात बदल होईल तेव्हा या अंदाजित खर्चात बदल होईल. त्या प्रकारच्या बदलास मान्यता देण्याचा अधिकार जिल्हा कार्यक्रम समन्वयक / जिल्हा कार्यक्रम सह समन्वयक/ आयुक्त, मग्रारोहयो यांना प्रदान करण्यात येत आहे.

**अनुज्ञेयता :-**

नियोजन (रोहयो) विभाग शासन परिपत्रक दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१२ अन्वये तसेच नियोजन (रोहयो) विभाग शासन निर्णय दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ मधील परिच्छेद ३.५.८ तरतुदींनुसार, १०० पक्ष्यांकरिता ७.५० चौ.मी.निवारा पुरेसा आहे तसेच त्याची लांबी ३.७५ मी. आणि रुंदी २.० मी.असावी. लांबीकडील बाजूस ३० सेमी उंच व २० सेमी जाडीची, विटांची जोत्यापर्यंत भिंत असावी. तसेच छतापर्यंत कुक्कूट जाळी ३० सेमी X ३० सेमीच्या खांबानी आधार दिलेली असावी. आखूड बाजूस २० सेमी जाडीची सरासरी २.२० मीटर उंचीची भिंत असावी. छतास लोखंडी तुळयांचा आधार द्यावा.छतासाठी गॅल्व्हनाइज्ड लोखंडी पत्रे / सिमेंटचे पत्रे वापरावेत. तळयाच्या पायासाठी मुरुमाची भर घालावी त्यावर दुय्यम दर्जाच्या विटा व सिमेंटचा १ : ६ प्रमाण असलेला मजबूत थर असावा. पक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.

**लाभार्थ्याने पक्ष्यांची व्यवस्था स्वत: करणे : -**

**सध्या शासन परिपत्रकानुसार १०० पक्ष्यांकरिता अनुदान अनुज्ञेय आहे. मात्र, यामध्ये असे स्पष्ट करण्यात येते की, ज्या शेतकऱ्यांना /शेतमजूरांना कुक्कुटपालन करावयाचे आहे. परंतु, १०० पेक्षा अधीक पक्षी ज्यांच्याकडे नाहीत अशा लाभार्थ्यांनी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर दोन जामिनदारांसह कुक्कुटपालन शेडची मागणी करावी व त्यानुसार संबंधीत यंत्रणेने संबंधीत लाभार्थ्यास शेड मंजूर करावे व शेडचे काम पूर्ण झाल्यानंतरच्या १ महिन्यांच्या कालावधीत कुक्कुटपालन शेडमध्ये १०० पक्षी पाळण्यासाठी आणणे बंधनकारक राहील. जरी शेड १०० पक्ष्यांकरिता अनुज्ञेय करण्यात आले असले तरीही सदर शेडमध्ये १५० पक्षी सामावू शकतात. त्यामुळे १०० पक्षी यशस्वीरित्या सांभाळणाऱ्या लाभार्थ्यांनी पक्ष्यांची संख्या १५० च्या वर नेल्यास सदर लाभार्थ्यास मोठ्या शेडसाठी दोनपट निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि, कोणत्याही कुटुंबास दोनपट पेक्षा अधीक निधी अनुज्ञेय राहणार नाही. अन्य तरतूदी उपरोक्त परिपत्रकानुसार राहतील.**

४) **भू-संजीवनी नाडेप कंपोस्टींग :-**

**गरज :-**

जमिनीच्या आरोग्यात सुधारणा केल्यास कृषी उत्पादनात मोठया प्रमाणावर भर पडू शकते. शेतातील कच-यावर कंपोस्टिंगव्दारे प्रक्रीया केल्यास त्यातील सेंद्रीय पदार्थ जैविक पध्दतीने, सूक्ष्म

जीव तसेच गांडुळाव्दारे कुजून त्यापासून उत्तम प्रकारचे हयूमस सारखे सेंद्रीय कंपोस्ट खत तयार होते. या खताचा वापर शेतात मोठया प्रमाणावर केल्यास, जमिनाच्या आरोग्यात सुधारणा होऊन, कृषी उत्पादनात मोठी भर पडू शकते. अशा सेंद्रीय पदार्थात सर्वच प्रकारचे सूक्ष्म जीव मोठया प्रमाणावर असतात. योग्य परिस्थितीत, या सूक्ष्म जीवांची संख्या वाढते आणि हे मोठया संख्येत असलेले सूक्ष्म जीव, सेंद्रीय पदार्थांचे विघटन झपाटयाने करतात.

**सिध्दांत :-**

नियोजन (रोहयो) विभाग शासन परिपत्रक दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१२ अन्वये तसेच नियोजन (रोहयो) विभाग शासन निर्णय दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ मधील परिच्छेद २.४ तरतुदींनुसार, नाडेप कंपोस्टिंग अंतर्गत ३.६ मी X १.५ मी X ०.९ मी आकाराचे जमिनीवरील बांधकाम अपेक्षीत असून, त्यापासून साधारणत: २ ते २.२५ टन कंपोस्ट खत ८० ते ९० दिवसांत तयार होते. हे खत ०.२५ हेक्टर क्षेत्रास पुरेसे आहे. शेतातून निघालेल्या सर्व वनस्पतीजन्य पदार्थांपासून सेंद्रीय खत तयार करुन, परत शेतात टाकणे ही काळाची गरज आहे. सेंद्रीय खतांमुळे जमिनीचा कस व जलधारण शक्ती वाढून पोषक द्रव्यांचा पुरवठा योग्य प्रमाणात होतो. जमीन भुसभूशीत राहून जमिनीत हवा खेळती राहते. शेतात उपयुक्त सूक्ष्म जिवाणूंची वाढ होण्यास मदत होते. नाडेपच्या बांधकामातील चारही भिंतीत छिद्रे ठेवली जातात, जेणेकरुन त्यातून हवा खेळती राहून सेंद्रीय पदार्थांचे विघटन होण्यास, कुजण्यास चालना मिळते.

**यशस्वीतोसाठी प्रक्रिया :-**

नाडेपचे बांधकाम पूर्ण झाल्यावर, त्यात सेद्रीय पदार्थ/ कचरा, शेण माती आणि मातीचे एकावर एक थर रचले जातात. साधारणत: पहिल्या थरात १०० किलो कचरा तळात रचला जातो, तो अंदाजे ६ इंच उंचीचा असतो. ४ किलो गायीचे शेण १२५ ते १५० लिटर पाण्यात मिसळून पहिल्या थरावर शिंपले जाते. हंगामातील तापमानानुसार पाणी कमी-जास्त लागते. या शेण पाण्याचा दुस-या थराच्या वर खडे, काच, इत्यादी विरहीत गाळलेली स्वच्छ माती (पहिल्या थरातील कच-याचे वजनाचे अंदाजे निम्मे ५० ते ५५ किलो) दुस-या थरावर पसरावी, त्यावर थोडे आवश्यकतेनुसार पाणी शिंपडावे. अशा प्रकारे एकावर एक थर नाडेप टाकीच्या टाकीच्या वर १.५ फुटापर्यंत रचून ढीग तयार करावा. त्यानंतर ढिगाचा वरचा थर ३ इंचचे शेण व मातीचे मिश्रणाने (४०० ते ५०० किलो) बंद करतात. २ ते ३ महिन्यात काळपट तपकिरी, भुसभूशीत, मऊ, ओलसर आणि दुर्गंध विरहीत कंपोस्ट तयार होते.

सदर कामाचा लाभ मिळविण्यासाठी मनरेगा योजनेच्या निकषानुसार स्वत:ची जमीन, वैयक्तीक लाभाच्या निकषानुसार इतर आवश्यक कागदपत्र असलेले लाभार्थी पात्र असतील.

**अनुज्ञेयता :-**

या कामाला नियोजन (रोहयो) विभागाच्या दिनांक ०२ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकातील परिशिष्ट-९ मधील अनुक्रमांक १३ नुसार नरेगा अंतर्गत रु.१०,५३७/- इतका अंदाजित खर्च येईल. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अकुशल खर्च | - | रु. ४,०४६/- | (प्रमाण ३८ टक्के) |
| कुशल खर्च | - | रु. ६,४९१/- | (प्रमाण ६२ टक्के) |
| **एकूण** | **-** | **रु.१०,५३७/-** | **(प्रमाण १०० टक्के)** |

नाडेपचा प्रमाण एवढा जास्त (किमान १० युनीट) करावा की फक्त याच्या आधारावर लोक सेंद्रीय खत तयार करुन आणि ते विकून समृध्दीकडे वाटचाल करतील.

**तथापि, हे मापदंड सध्या प्रचलित मजूरी दर व DSR प्रमाणे आहे. जेव्हा केव्हा या दोनपैकी कोणत्याही एक किंवा दोन्हींच्या दरात बदल होईल तेव्हा या अंदाजित खर्चात बदल होईल. त्या प्रकारच्या बदलास मान्यता देण्याचा अधिकार जिल्हा कार्यक्रम समन्वयक / जिल्हा कार्यक्रम सह समन्वयक/ आयुक्त, मग्रारोहयो यांना प्रदान करण्यात येत आहे.**

५. **६०:४० चे प्रमाण राखणे:-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत भू-संजीवनी नाडेप कंपोस्टींग हे काम वगळता उर्वरीत **जनावरांचा गोठा बांधणे, शेळीपालन शेड बांधणे व कुक्कूटपालन शेड बांधणे** इत्यादी कामाचे अकुशल-कुशल प्रमाण हे अनुक्रमे ८:९२, ९:९१ व १०:९० इतके आहे. सदर बाब पाहता, सदर कामांमुळे जिल्हयांचे ६०:४० (अकुशल-कुशल) प्रमाण राखले जाणार नाही. त्यामुळे सदरची कामे हाती घेत असताना अकुशल-कुशल प्रमाण राखण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे इतर अनुज्ञेय कामे हाती घेण्यात यावीत.

१) वैयक्तिक वृक्ष लागवड व संगोपन (३ वर्षे -१ हेक्टर) (कोणतेही वृक्ष किंवा विविध वृक्षांचे मिश्रण)
२) वैयक्तिक शेततळे - १५ X १५ X ३.००
३) शेत किंवा बांधांवर वृक्ष लागवड (बिहार पॅटर्न)
४) शोष खड्डे
५) कंपोस्ट बंडिंग

वरील यादी फक्त उदाहरणादाखल दिले आहेत. तथापि ६०:४० चा प्रमाण राखण्यासाठी जे काही काम ग्रामपंचायत / लाभार्थ्यास आणि यंत्रणेस सुचेल ती मजुरीचे प्रमाण अधिक असलेली सर्व कामे घेता येतील. **याप्रमाणे जनावरांचा गोठा बांधणे, शेळीपालन शेड बांधणे व कुक्कूटपालन शेड बांधणे यापैकी एक काम एका लाभार्थ्यास मंजूर करुन प्रत्येक लाभार्थी पातळीवर मग्रारोहयो अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या विवीध कामाच्या संयोजनातून ६०:४० चा अकुशल कुशल प्रमाण राखण्याचा प्रयत्न करावा.** अपवाद परिस्थितीत इतर वैयक्तिक किंवा सार्वजनिक कामांच्या बचतीतून कुशल खर्चाचा उपयोग करुन ६०:४० चा प्रमाण राखण्यात यावा.

तसेच ज्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये नरेगा अंतर्गत अनुज्ञेय २७५ वैयक्तीक व सार्वजनिक कामांपैकी ज्या कामांमध्ये अकुशल खर्चाचे प्रमाण जास्त आहे, अशी वैयक्तीक व सार्वजनिक स्वरुपाची कामे हाती घेऊन सुध्दा अकुशल-कुशल खर्चाचे ६०:४० प्रमाण राखण्यात यावा.

**इतर मजूरांचा रोजगार किंवा लोकांच्या श्रमदानाची मदत** :-

कुटुबांच्या समृध्दीकरीता मग्रारोहयोंतर्गत अनुज्ञेय विविध कामांचे संयोजन केल्याने एका कुटुंबास एकाच वर्षात १०० पेक्षा अधिक दिवसांची कामे द्यावी लागू शकते. अशा परिस्थितीत गावातील इतर कामांची मागणी करणारे इतर मजूरांना वैयक्तिक कामात काम करण्याची परवानगी देण्यात यावी. गावात कामाच्या मागणी करणाऱ्या मजूरांची संख्या कमी असल्यास इतर लोकांना श्रमदान करुन मदत करण्यास विंनती करण्यात यावी. हे कार्य श्रमदान समजले जात असते तरी त्या कामाचा मोबदला देण्यात यावा, अन्यथा ६०:४० चा प्रमाण राखण्यात अडचण निर्माण होईल.

६) **प्रशिक्षण :-**

सदर योजनेमध्ये शेतकरी लखपती व्हावा ह्यासाठी विविध योजनेच्या माध्यमातून समृध्दी साखळी निर्माण व्हावी हा उद्देश आहे. सदर योजनेतून प्रामुख्याने गुरांचा गोठा, शेळ्या किंवा मेंढ्यांचा गोठा, कुक्कुट पालन शेड इत्यादींचा समावेश असले तरी सोबतीला फळबाग, वृक्ष लागवड, शेततळे व इतर योजनांचा समन्वय साधावयाचा आहे. ह्या सर्व बाबींसाठी दृष्टीकोण विकसित होण्यासाठी प्रशिक्षणाची गरज राहील.

पशुसंवर्धन सोबत चारा व पशु खाद्याचा विषय येतो. जनावरांचे आरोग्य आणि चारा व पशुखाद्याचा जवळचा संबंध आहे. म्हणून गोठ्यांचे व्यवस्थापन जनावरांचे आरोग्य व योग्य संगोपन आणि चारा व पशु खाद्य निर्मिती तसेच, गुरांच्या शेण, लेंडी व विष्ठेपासून सेंद्रिय खताचे विविध प्रकार तयार करण्याचे प्रशिक्षण द्यावे लागतील जेणेकरुन सेंद्रीय शेती सोबतच पशुसंवर्धन हे पूरक व्यवसाय करुन समृध्दीकडे वाटचाल करुन लखपती होण्याचे स्वप्न साकारता येईल.

सेंद्रीय शेती व जैवीक शेतीच्या माध्यमातून मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी सेंद्रिय व जैवीक खत निर्मिती आणि विविध झाडपाल्यापासून व पशु मुत्रापासून किटक नाशके सुध्दा बनवता येतात. ज्यामध्ये प्रामुख्याने लिंबोळी अर्क दशपर्णी अर्क लमीता इत्यादींचा समावेश होतो.

ह्या सर्व बाबी एकत्रितपणे शिकण्यासाठी तसेच ह्या पध्दतीचा अवलंब करतात अशा ठिकाणी त्यांचे युट्युबवरील व्हिडीओ दाखवून, शासकीय संस्था व स्वयंसेवी संस्थांकडे प्रशिक्षण आयोजित केले जातील. ज्यामध्ये दृष्टीकोण बदल ते बाजारपेठ व पूरक व्यवसायास चालना देणे यांचा समावेश असेल. अशा प्रकारच्या संयोजनातून प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केले जाईल. या संपूर्ण प्रक्रियेचा ॲपद्वारे पाठपुरावा करण्यात येईल.

७. **इष्टांक** :-

वरील प्रकारची कामे करुन गांवातील / तालुक्यातील / जिल्हयातील आणि राज्यातील १०० टक्के कुटुंबांना समृध्द करावयाचे आहे. यात कृषी व पशुसंवर्धन विभागाची विशेष मदत लागणार आहे.

अत: या विभागांनी जिल्हा व तालुका प्रशासनाला स्वत: पुढाकार घेऊन मदत करावी. सुरुवातीच्या टप्प्यात प्रत्येक गावात किमान लाभार्थ्यांस लखपती करुन बघावे. याचा पाठपुरावा ॲपच्या माध्यमातून करण्यात येईल.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौस-२९५/२०२०/ व्यय-८ दिनांक ०४ डिसेंबर, २०२० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०२०४१२४७५५३२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NANDKUMAR VERMA

Digitally signed by NANDKUMAR VERMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, pseudonym=8DD51EE304775C22C23852DC8597F84B9FEF8A01, serialNumber=DCD3577EBF0E05E2A8B57095C152DC6CFB37C2BB83DA197788645DD8A362EBC5, cn=NANDKUMAR VERMA
Date: 2021.02.04 12:57:38 +05'30'

**( नंद कुमार )**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) आयुक्त, नरेगा, नागपूर
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
५) सर्व उपआयुक्त (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय.
६) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय.
७) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो/ग्रा.पं.)
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
९) सहाय्यक संचालक (लेखा), रोहयो-७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती, रोहयो-७.

**प्रत माहितीसाठी,**

१. मा. मंत्री, रोहयो यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री, रोहयो यांचे खाजगी सचिव
३. प्रधान सचिव, रोहयो यांचे स्वीय सहाय्यक.

## परिशिष्ट -१

## एकात्मिक सेंद्रिय शेती व थेट विक्री अल्पभूधारकांना वरदान

आपण आतापर्यंत मोठया प्रमाणात एकपीक पध्दतीमध्ये काम केले म्हणजे कांदा तर कांदा, टोमॅटो तर टोमॅटो, डाळींब तर डाळींब, द्राक्षे तर द्राक्षे, तुर तर तुर संपूर्ण गावाने, तालुक्याने एकच पीक आणि मग यामध्ये मोठया प्रमाणात उत्पादन झाले की, भाव पडतात हे या ७० वर्षात कोणाच्याच कसे लक्षात येत नाही? म्हणजे सर्वांनी फक्त उत्पादन वाढीसाठी काम करायचे आणि मार्केटचा अभ्यास बाकी अजिबात नाही. याच कारणाने गेल्या ७० वर्षात शेतकरी सक्षम किंवा श्रीमंत झाला नाही. मग श्रीमंत कोण झाले, कधीच शेती न करता सल्ला देणारे, बियाणे, खते, औषधे, मशीनरी विकणारे, दलाल, अधिकारी सगळेच. आणि गरीब कोण राहिले तर रोज १६ तास राबणारा, कधीही कुटुंबाला वेळ न देता, न थकता, राब-राब राबणारा शेतकरी. याचा आपण शेतकरी अभ्यास का करत नाही?

म्हणून माझी सर्व शेतक-यांना विनंती राहणार आहे की, आपण यापुढे एक पीक पध्दत बदलली पाहिजे. त्याऐवजी मिश्र पीक पध्दती वापरली पाहिजे. म्हणजे फळे, भाज्या, धान्य, दुध सर्वच पीके थेट ग्राहकांच्या मागणीनुसार पिकवायची आणि स्वत:च विक्री करायची. यामध्ये सर्व शेतमाल मिळून २५-२६ प्रकार केले तर, ग्राहकांना सुध्दा व्हरायटी माल लागत असल्याने ग्राहक एकच माल असेल तर १०-२० रु चा खरेदी करेल. पण २०-२५ व्हारायटी असेल तर सगळयाच भाज्यातील थोडया थोडया घेईल आणि ३००-४०० रू.ची खरेदी होईल. तसेच भाव पडले तरी ३-४ प्रकारच्या मालाचे पडतील. बाकीच्या शेतमालाचे चांगले पैसे मिळतील. शेतक-यांना कधीच तोटा होणार नाही. पिकांची फेरपालट झाल्याने जमीनीचे आरोग्यही चांगले राहील.

आम्ही अभिनव फार्मर्स क्लब पुणे मार्फत गेल्या १५ वर्षा पासून अशा प्रकारची शेती करतोय. ४०-५० प्रकारच्या भाजीपाला, १५-२० प्रकारची फळे, २०-२५ प्रकारची धन्ये/ डाळी/ कडधान्ये, दुधाचे पदार्थ ग्रुपने एकत्र येऊन निर्माण करतो. आणि महिला बचत गटांमार्फत तोडणी ते थेट ग्राहकांपर्यंत मोबाईल ॲपवर ऑर्डर घेऊन पोहचवीत आहोत. यामध्ये प्रत्येक १-२ एकरच्या शेतक-याला १०००-२००० रूपये दररोज मिळतात. शिवाय १०० टक्के लोक निर्व्यसनी आहेत. यामुळे प्रत्येक घर सुखी आणि समाधानी आहे.

### असी शेती कसी करावी?

आता कशा पध्दतीने या प्रकारची शेती करायची ते आपण पाहू. सुरवातीला प्रत्येक शेतक-याने अवघ्या एक एकर शेतीपासून सुरुवात करायची आहे. ज्याच्याकडे ज्यास्त जमीन आहे आणि त्यांना चांगले प्रॉफीट मिळत आहे. त्यांनी त्यांचा प्रकल्प तसाच चालवावा उलट अनेकांना त्याबद्दल माहिती देऊन मदत करावी. म्हणजे सर्वांची शेती फायद्याची होईल. आणि जे खुप वर्षापासून मोठी शेती करतात, परंतु दरवर्षी मोठा तोटा सहन करावा लागतो त्यांनी आता मोठी शेती करून तोटा सहन करण्यापेक्षा छोटी म्हणजे १-२ एकराची शेती करून फायदा कसा कमवायचा ते आपण पाहू.

आपण एक एकरची शेती करणार आहोत म्हणजेच ४० गुंठयांची

<table>
<tr><td rowspan="3">मुख्य रस्ता</td><td colspan="2">भाग १ - १० गुंठे शेड हाऊस- परदेशी भाजीपाला</td><td>भाग २ - १० गुंठे उघडयावर दुधी, दोडका, कारली, टोमॅटो, काकडी</td></tr>
<tr><td>१ गुंठा पॅक हाऊस</td><td rowspan="2">भाग ४ - ८ गुंठे पालेभाज्या</td><td rowspan="2">भाग ३ - १० गुंठे उघडयावर कोबी, फलॉवर, गवार, भेंडी इत्यादी</td></tr>
<tr><td>१ गुंठा देशी गायीचा गोठा</td></tr>
</table>

या १ एकर शेतीमध्ये आपण १०-१० गुंठयाचे ४ भाग केलेत. या एक एकरच्या शेतीला दररोज १० ते १५ हजर लिटर पाणी लागणार आहे. सिंगल फेज १ ते २ तास विज लागणार आहे. १ गीर, साहीवाल, थारपारकर, लाल सिंधी, कांकरेज किंवा राठी गाय लागणार आहे. जी दररोज ८ ते १२ लिटर दुधर देणारी. या प्रकल्पात स्वत: नवरा-बायकोने सकाळी २ तास आणि संध्याकाळी २ तास काम करावे. या संपूर्ण एक एकर शेतीच्या बांधावर १०-१० फुटावर वेगवेगळया १०-१५ प्रकारची ५-५ फळझाडे लावावीत. जसे पेरु, सिताफळ, पपई, ॲपल बोर, देशी केळी, शेवगा, कडीपत्ता, लिंबु, केशर, हापूस, अंजीर, संत्री, मोसंबी इत्यादी. या झाडांमुळे शेताचे वातावरण नियंत्रीत राहिल आणि कुटुंबाला सिझनेबल फळे खायला मिळतील. शिवाय घरी खाऊन शिल्लक राहिलेली फळे ज्या लोकांना भाज्या विकतो त्यांनाच विकत देऊन नोकरी करणा-यांना जसा दिवाळीत बोनस मिळतो तसा शेतक-यांनाही सिझनेबल फळामधून घरी खाऊन राहिलेली फळे विकुन बोनस मिळेल.

आता आपण १०-१० गुंठयांच्या ४ भागांपैकी म्हणजे भाग-१ वर १० गुंठयात शेड हाऊस (राऊंड टाईप) मध्ये परदेशी भाजीपाला लागवड करणार आहोत. आणि हा सर्व परदेशी भाजीपाला पुणे-मुंबई-नागपूर- गोवा- कलकत्ता- हैद्राबाद-बेंगलोर सारख्या मोठया शहरात लक्झरी बस किंवा रेल्वेने पाठविणार आहोत. यामधून आठवड्याला ८० ते १०० किलो भाजीपाला निघेल. याला ७०-८० रूपये किलोला भाव मिळाला तरी आठवड्यात ७-८ हजार रुपये मिळतील.

भाग-२, भाग-३, भाग-४ यावर आता उघडयावर भाजीपाला (भारतीय) करणार आहोत. कारण याआधी १० गुंठे क्षेत्रावर आपण शेडनेट हाऊस मध्ये परदेशी भाजीपाला लागवड करून दररोज शाश्वत १०००-१२०० रूपये कमवायला लागलो. ऊन, वारा, पाऊस गारपीटया तीनही ऋतूत संरक्षीत शेती केल्याने दररोज पैसे हातात येतील. यामुळे रोजच्या पैशाची गरज पूर्ण होईल. दररोज पैशाची चटक लागली तर व्यसनाकडे किंवा नको त्या कामाकडे वळणार नाही. त्याला वेळही मिळणार नाही.

भाग-२ नंबरच्या १० गुंठयाच्या शेतात वेलवर्गीय पिके मांडव करून करायची आहेत. दुधी, दोडका, कारली, टोमॅटो आणि काकडी दररोज २-२ किलो किंवा आठवड्यात २ वेळा ३०-४० किलो काढणी केली तरी १५०० ते २००० रु मिळतील. भाग-३ मध्ये फळभाज्या कोबी, फलॉवर, गवार, भेंडी,

भरत वांगे, काटेरी वांगे लागवड करायची. यातून दररोज २-२ किलो सगळया व्हरायटी काढल्यातर १० किलो होईल. २० रूपये किलो भाव मिळाला तरी २०० रूपये मिळतील.

भाग-४ मध्ये ८ गुंठयावर पालेभाज्या करायच्या आहेत. पालक, लालमाठ, मेथी, कोथींबीर, कांदा पात, चवळई इत्यादी. या प्रत्येक भाजीच्या दररोज ५ जुडया काढल्यातर ३० जुडया. ५ रूपये भाव मिळाला तर २०० रूपये मिळतील. राहिलेल्या २ गुंठया पैकी १ गुंठयावर १ पॅक हाऊस करायचे. भाज्या स्वच्छ करून, छान पॅकींग करून विकल्यास भाव जास्त मिळतो. आणि दुस-या एका गुंठयावर १ गायीचा गोठा, तिला हायड्रोफोनिक्स चारा, दररोज फिरायला जागा. गायीचे रोज १० लिटर दूध ६०-७० रूपये दराने विक्री करून ५००-६०० रूपये मिळतील. सकाळी २-३ लिटर गोमुत्र बादलीत धरून, १००-१०० मिली च्या बाटल्यात भरून १० रूपये १ प्रमाणे विक्री केल्यास २०० रूपये मिळतील. १०-१५ किलो शेणापैकी १० किलो शेणापासून बायोगॅस तयार करून, सिलेंडर, रॉकेल, लाकडे याचे पैसे वाचविता येतात. आणि त्यातून बाहेर पडणारी आठवडयाची ३०० लि. स्लरी शेतीमध्ये उत्तम खत म्हणून वापरता येते. कुठलेली महागडे खत विकत घ्यायला नको. २ किलो शेणापासून १०-२० पाकीटे गोव-या करून ग्राहकांना मच्छराच्या कॉईल वापरण्याऐवजी घरात गोवरीचे अग्नीहोत्र करून मच्छरही जातील. आणि वातावरणही स्वच्छ करता येईल. तसेच होम हवन साठी मोठ्या प्रमाणात मागणी आहे. ५ गोव-यांचे पाकीट १५ रूपयाला विक्री करून २०० रूपये मिळतील.

आता वेगवेगळया प्रकारच्या २०-२५ भाजीपाल्यांच्या पिकातून १५०० ते १७०० रूपये आणि गायीचे दुध,गोमुत्र आणि गोव-या यातून ७००-८०० रूपये म्हणजेच दररोज २००-२२०० रूपये. शिवाय दिवस आनंदात जाईल. नवरा-बायकोचे भांडण होणार नाही. कारण दोघांच्या हातात दररोज पैसे येईल. कुठलीही उधारी नाही, टेंन्शन नाही, कुणाची दुश्मनी नाही. मुलांचे शिक्षण, संस्कार याकडे लक्ष देता येईल. त्यांच्या करीअरची काळजी नाही. कारण पुढे जाऊन हाच व्यवसाय त्यांना करायचा आहे. कारण जगातील माणसे जोपर्यंत जिवंत आहेत तो पर्यंत हा व्यवसाय चालणार आहे.

आता हे एवढे पैसे दररोज मिळवून राजा सारखे कुटुंब जगण्यासाठी विषमुक्त अन्न खाणारी, नोकरीवाले, व्यवसायावाले, चांगल्या विचारांचे २५-३० ग्राहक आपल्याला शोधावे लागतील. एकदा ग्राहकांपर्यंत हा विषमुक्त शेतमाल पोहोचला की, खुप लोक अजून ग्राहक देतात. मग आपण १ एकरची ५ एकर पर्यंत मजल मारू शकतो. १५-२० शेतकऱ्यांना घेऊन गृप ही करू शकतो. शेतमाल विक्रीची जबाबदारी महिला बचत गटांना देऊ शकतो. कामाला माणसे ठेवू शकतो. मुलांचे शिक्षण पूर्ण करून ॲटोमेशन, छोटी-छोटी मशीनरी तयार करून मजूर समस्येवर पर्याय काढू शकतो. अनेक जणांना या पध्दतीत आणून आपल्या प्रमाणे त्यांनाही पैसे कमवून देऊ म्हणजे संपूर्ण राज्यातील अल्पभूधारक शेतकरी खरेच राजा होईल.

यामध्ये संपूर्ण कटूंबाने काम करावे, कोणी शेतात, कोणी मार्केटींग, कोणी ॲटोमेशन, कोणी दुध काढणे वगैरे. कारण मुलांना नोक-या शोधून नोकर बनविण्यापेक्षा शेतीत चांगली तयार करून फायदा-तोटा काय असतो हे दाखवून या व्यवसायात आणून मालक बनवू शकतो.

**ज्ञानेश्वर बोडके**

**पदवीधरांना कृषि उद्योग**

सध्या मोठया प्रमाणात शेतक-यांची मुलं ही अनेक विषयांच्या पदव्या घेऊन दररोज जाहिराती पाहुन नोक-या शोधण्यात दंग झालेले आपण पाहतो. काही स्पर्धा परिक्षांच्या क्लासेसमध्ये दंग झालेले दिसतात. परंतु एकही मुलगा, मग तो शेतकरी कुटूंबातील असो किंवा नसो शेती करण्याचा विचार करत नाही. कृषि प्रधान असलेल्या देशात एक दिवस कोणीच शेती पिकवायची नाही म्हटल तर काय होईल?

जोपर्यंत जगात शेती जिवंत आहे तो पर्यंतच माणसांना खायला मिळेल. हे कटू सत्य असूनही कोणाच्या ही लक्षात येत नाही. इकडे-तिकडे नोक-यांच्या मागे फिरून वेळ वाया घालवण्यापेक्षा प्रत्येक पदवीधर तरूण-तरूणींनी शेती हा उद्योग समजून १-२ एकराच्या शेतीत, जीमला जाण्यापेक्षा सकाळी २ तास व संध्याकाळी २ तास काम करून जगण्यापुरते पैसे व आनंद मिळवला, तर शिक्षणाचा उपयोग शेतीत होऊन चांगले उद्योजक निर्माण होतील.

मी प्रिया ज्ञारेश्वर बोडके, माण-बोडकेवाडी, ता. मुळशी, जि. पुणे-४११०५७ मी कृषि पदवी पर्यंत शिक्षण घेतले आहे. वयाच्या १०-१२ वर्षा पासून शेतात लागवडी, खुरपणी, फवारणी, पावर टिलर चालवून गादीवाफे बनवणे ही सर्व कामे करू लागले. यातून मजूर तर वाचला शिवाय कामही चारपट होऊ लागली. मग शेतमाल तोडणी करून बाजार समितीत विकला असता, त्या दिवसाचा खर्चही निघत नव्हता. पुण्यात भीमथडी जत्रेत सेंद्रिय शेतमाल विक्रीचा स्टॉल मिळाला त्यातून ग्राहकांच्या आवडी-निवडी, पॅकिंग, ग्राहकांशी बोलणे शिकायला मिळाले. नाबार्डने त्यांच्या गृहनिर्माण सोसायटीत जाऊन शेतमाल विक्री ची संधी दिली याच संधीचे सोने करता आले. आज संपूर्ण देशभर शेतकरी गटांना आम्ही थेट विक्री शिकवून करोडो रुपये कमवत आहोत. यातून चांगले पैसे मिळायला लागले. ख-या अर्थाने पदवीधरांनी फायद्याची शेती करून नोकर बनण्यापेक्षा मालक बनून जगावे हे सिध्द झाले. आपण बाजारसमितीत शेतमाल विकायला जातो, आपल्याला न विचारता शेतमालाचा भाव ठरवला जातो. त्यामुळे खुप वेळा उत्पादन खर्चही निघत नाही. आणि तोच शेतमाल ग्राहकांपर्यंत चार पट किंमतीने विकला जातो. आपण शेतक-यांनी शेतमाल सेंद्रीय पध्दतीने पिकवून, दलाल वगळून, थेट ग्रहकांपर्यंत पोहचविला तर चारपट पैसे आपल्याला मिळणार नाहीत का?

हेच काम आम्ही अभिनव फार्मर्स क्लब मार्फत गेल्या २० वर्षापासून करीत आहोत. यामुळे माझ्या कृषि पदवीधर शिक्षणाचा उपयोग जवळच्या २०००-३००० शेतक-यांना होऊन अनेक बचत गटांच्या महिला पॅकींग, ग्रेडींग आणि थेट विक्री करून आपली कुटूंबे छान जगवीत आहेत. त्यामुळे नोकरी न करता स्वत:चे कुटूंब छान सांभाळून, आपल्या शिक्षणाचा उपयोग अनेक गरीब कुटुंबासाठी होत आहे. यातुन करोडो रुपयाचे समाधान मिळत आहे.

सध्या मी अभिनव फार्मर्स क्लबच्या विक्री व्यवस्थेमध्ये ॲपचा वापर करून ऑर्डर घेणे, ग्राहकांची बिले बनविणे, ऑनलाईन पेमेंट जमा करणे व ड्रायव्हर नसेल तर स्वत: गाडी चालवून ग्राहकांपर्यंत शेतमाल पोहचविणे ही सर्व कामे स्वत: करून कृषि पदवीधर २०००-३००० मुलांना कामामध्ये रोजगारही दिला आहे. आम्ही सर्व शेतक-यांच्या मुली दररोज कॉलेजला जाण्यापेक्षा मुक्त

विद्यापिठामधून कृषीपदवीधर झालो. कॉलेज ला आठवड्यात २ च दिवस जायचो बाकीचा वेळ शेतात प्रॅक्टीकली करतो. यामुळे आत्मविश्वास खूप वाढला. या अनुभवाच्या जोरावर एकही विद्यार्थी कुठल्याही व्यवसायात नुकसानीत जाऊ शकत नाही. असा माझा गेल्या १०-१२ वर्षापासूनचा अनुभव आहे. फक्त डोळे उघडे ठेवून कृषी पदवीधरांनी स्वत: शेतमालाचे मार्केटींग करून आई-वडीलांचा तोटयात गेलेला शेती व्यवसाय फायद्यात आणता येईल.

**मार्केटचा विचार करूनच लागवडी**

शेतमालाची थेट विक्री करताना प्रथम मार्केटचा विचार करून मगच लागवडी कराव्या लागतील. याच सोबत ग्राहकांची गरज ओळखून १०० टक्के विषमुक्त अन्न निर्माण करून शाळा, कॉलेज, दवाखाने व गृहनिर्माण संस्था यामध्ये जाऊन आपल्या शेतमालाविषयी ग्राहकांना सविस्तर माहिती देऊन ग्रहकांचे नाव, नंबर घेऊन त्यांना मोबाईल ॲपवर जोडून आठवडयातून एक दिवस भाज्या, धान्य, दूध, फळे घरपोच देता येईल. आणि विषमुक्त अन्नामुळे दवाखान्याच्या खर्चात मोठया प्रमाणात बचत होईल. असे काम सध्या पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, औरंगाबाद, परभणी, जालना या भागात अभिनव फार्मर्स क्लब मार्फत चालू आहे. यातून अनेक पदवीधर नोक-या ऐवजी व्यवसायिक बनले आहेत.

म्हणून माझी सर्व पदवीधरांना विनंती आहे की, ज्यांच्याकडे शेती आहे त्या शेतकऱ्यांच्या मुलांनी रासायनिक खतांचा वापर न करता देशी गायी च्या शेण गोमूत्राचा वापर करून, ऑटोमेशन, मशिनरीचा वापर करून शेती करावी. म्हणजे दररोज घरात पैसे येतील. आणि मुलीही शेतकऱ्यांशी लग्न करण्यास तयार होतील. तसेच ज्यांच्याकडे शेती नाही, अश्या पदवीधरांनी गावामध्ये २०-३० शेतक-यांचा गट करून त्यांचा शेतमाल विक्रीचे काम करून पैसे कमविता येईल. २१ व्या शतकात स्वतः विषमुक्त शेतमाल पिकवून स्वतःच विकावा लागेल. तरच शेतकरी सुखी व संपन्न होणार आहे.

**सौ. प्रिया सागर जाधव**

**व्यवसायाचे स्वरूप व नविन उपक्रम - प्रमोद बोडके**

शाळा-कॉलेज मध्ये जात असताना आई-वडील शेती करीत असल्याने कायम मजूर ही समस्या असायची. त्यामुळे मला व बहिणीला दररोज सकाळी १ तास संध्याकाळी १ तास शेतात काम करायला लागायचे. त्यामुळे शिक्षण घेताना कधीही पैशाची अडचण आली नाही. उलट कामाची सवय झाली. काम केले की आई-बाबा त्या कामाचा मोबदला द्यायचे. त्यातुनच आम्ही दोघेही पदवीधर झालो. पैसे मिळत राहिल्याने शेतक-याचा मुलगा आहे, म्हणून गरीब आहे असे कधीही आई-बाबांनी जाणवून दिले नाही. आई-बाबा देशी गायीच्या शेण-गोमुत्राचा वापर करून भाज्या, धान्ये, दुध, फळे याचे उत्पादन घेऊन स्वत: घरोघरी जाऊन विक्री करत असल्याने घरात दररोज पैसे येत होते. म्हणून आम्हाला कधीही पैशाचा तुटवडा जाणवला नाही. परंतु आई-वडीलांना खुप काम असायचे. आरामच मिळत नव्हता. म्हणून काहीतरी करायला पाहिजे हा विचार मी केला. आणि कामासोबत चांगला अभ्यास करून मॅकॅनिकल इंजिनिअर झालो. आणि मजूर समस्येवर काम सुरू केले.

सर्वात आधी १० वर्षापूर्वी वडीलांनी १ देशी (गीर) गाय घेतली. दररोज चा-यासाठी २-३ तास वेळ द्यावा लागायचा. विकत घेतला तर खुप पैसे लागायचे. मग सुरू केले हायड्रोपोनिक्स चारा युनिट, माती विरहीत, खते-औषधे नाही. गायींना खायला चांगला भरपूर प्रोटीन्स, फायबर असलेला चारा तयार केला. शिवाय लाख-दीड लाख रूपये खर्च त्यामुळे कोणीही शेतकरी हा चारा तयार करायला तयार नाही. अवघ्या २५,००० रूपयात तीन गायीसाठी युनीट तयार केले. गेल्या १० वर्षापासून अशी युनिट तयार करून शेतक-यांना विक्री करीत आहे. २-३ मुले हाताखाली घेऊन काम करीत आहे. १८-२० लाख दरवर्षी कमवितो.

मग शेतातही पॉलीहाऊस मधील बेड बनवायला, इतर राज्यातील मजूर आणून भरपूर पैसे द्यायला लागायचे. मजूर वेळेवर मिळत नसायचे. म्हणून पॉवर टिलर डिझाईन तयार करून बनवून घेतला.

१० गुंठयाच्या पॉलीहाऊससाठी बाहेर राज्यातील लोकांना ३०,००० रूपये द्यावे लागायचे. तेच काम आमचा पॉवर टिलर ७-८ लिटर पेट्रोल आणि माझा दिवसभराचा वेळ म्हणजेच १५००-२००० रूपयात व्हायला लागले. शिवाय मोठमोठया कंपन्या ८० हजार ते १.५० लाख रूपयात हे पॉवर टिलर विक्री करत होत्या. आम्ही अवघ्या ४५ हजार रूपयात द्यायला लागलो. यातुनही आम्हा १०-१२ लोकांना रोजगार मिळाला. अवघ्या २-३ लिटर पेट्रोल खर्चात व एका माणसात करायला लागलो. शेतक-यांना अनेक समस्या आहेत. म्हणून शेतकरी कायम गरीब आहे. यावर कोणच काम करीत नाही, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी काम करायला पाहिजे. आपण सर्व सुशिक्षीत तरूणांनी शिक्षण घेऊन शेतीतील गरीबी, दारिद्रय दूर करायला मदत केली पाहिजे. सध्या नोक-या मिळणे फार अवघड आहे. परंतू शेतीत खुप हुशार माणसांची गरज आहे.

दररोज शेतात रोपांना पाणी, खते द्यावी लागतात. म्हणून ॲटोमेशन सुरू केले. पाण्याचा पंप आपोआप चालु होतो, पाणी देऊन झाले की आपोआप बंद होतो. जेव्हा झाडाला पाण्याची गरज असेल तेव्हा, तापमान वाढले की पाणी आपोआप सुरू होते, बंद होते. औषध फवारणीचा पंप फार कमी किंमतीत बॅटरी वर केला. लाईट असेल तेव्हा चार्जिंग करून ठेवायचा. पाहिजे तेव्हा वापरायचा. औजारे खुप कंपन्या खूप महाग विकतात. शेतक-यांना परवडेल अशा किंमतीत मशिनरी बनवून विक्री केली तरी अनेक इंजिनिअरना रोजगार मिळेल मालक म्हणून. अगदी खुरपे, विळे, कात्री, कुदळ, फावडे आशा औजारांच्या फॅक्टऱ्या टाकता येतील. हा सुद्धा खूप मोठा व्यवसाय आहे. कारण शेतीत हाताने काम करणे कोणालाही आवडत नाही पण मशीनने काम करणे सर्वांना आवडेल. अशा औजारांना खुप मागणी आहे. यातून मी आता २-३ हजार तरूणांना एकत्र करून सर्व प्रकारची शेतीची औजारे बनवायचे काम दिले आहे. यातून शेतक-यांना मजूर समस्येवर कायमचा पर्याय मिळणार आहे. तोही फार स्वस्तात आणि लाखो तरूण इंजिनिअरर्सला रोजगार ही मिळेल. तोही मालक म्हणून, नोकर म्हणून नाही. आणि करोडो रुपयांची उलाढाल ही होईल. शिवाय सर्व मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत.

शेतीच्या प्रत्येक समस्येवर रडत बसण्यापेक्षा त्यावर पर्याय काढून मात करू. म्हणजे जास्तीत जास्त शेतक-यांच्या मुलांना शिक्षण घेऊन नोकरीकडे न वळता शेतीकडे इंडस्ट्री म्हणून बघतील. विषमुक्त अन्न तयार करून ग्राहकांना थेट घरपोच दिले तर आजारावरचा खर्च कमी होईल. आपणही जीमला न जाता शेतीत काम करून आरोग्यदायी जगू. शिवाय रोज पैसेही कमवू. वेगळे करियर शोधण्याची गरज नाही.

विक्री व्यवस्थेसाठी आय आय टी पवई च्या मदतीने लोककार्ट नावाचा ॲप तयार करून अनेक ठिकाणी भाजी घरपोच द्यायला सुरू केली. आता सध्या आय टी इंजिनिअर अनिल कवळे काकांसोबत अभिनव कार्ट अँप वरून पुण्या-मुंबईत घरोघरी १२३ टेम्पो द्वारे शेतमाल महिला बचत गटांच्या मदतीने घरपोच देत आहे. यामध्ये अरुणा शेळके मावशींच्या मार्गदर्शन खाली १३६० महिलांना रोजगार मिळालेला आहे. आपणही सर्व तरूणांनी या चळवळीत सामिल होऊन आपला करियरचा प्रश्न सोडवावा आणि इंजिनीअरिंगच्या शिक्षणाचा उपयोग शेतक-यांना फायद्याची शेती करण्यास करावा.

या व्यवसायाला पुढे माणसे जीवंत असे पर्यंत काहीही भिती नाही. शेतक-यांच्या आत्महत्या थांबविणे हे आपल्या तरूणांपुढे सर्वात मोठे आव्हाण आहे. तसेच थेट विक्रीमुळे शेतक-यांच्या शेतमालाला हमखास चांगला भाव मिळणार आहे. वडीलधा-या मंडळींनी तरूण होतकरू मुलांना यामध्ये सपोर्ट केला पाहिजे. नुसता नोकरीचा आग्रह धरू नका. यातूनच तरूण उद्योजक निर्माण होऊन देश समृध्द होईल.

**इंजि.प्रमोद बोडके**